**<u>ठळक बातम्या</u>**

- हरवलेल्या महिलांचा तपास करण्यासाठी राज्य सरकारकडून विशेष पथक
- कर्जवसुलीत रिझर्व बँकेच्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्या संस्था किंवा सावकारांवर कारवाई करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन
- राज्य परिवहन महामंडळाची शिवनेरी बस सेवा आता आणखी आठ मार्गांवर धावणार
- राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी भाजपाकडून विनोद तावडे, रामदास आठवले यांना संधी, महाविकास आघाडी शरद पवारांच्या पाठीशी

**आणि**

- सिंधुदुर्गवगळता कोकणातल्या इतर भागात हवामान विभागाकडून उष्णतेचा यलो अलर्ट

**<><><><><><>**

हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यासाठी राज्य शासनाने तयार केलेल्या विशेष पथकामुळे गेल्या वर्षभरात हरवलेल्या महिलाचा शोध लागण्याच्या प्रकरणांची संख्या १० टक्क्यांनी वाढल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी आज विधानपरिषदेत दिली.

**मुख्यमंत्री BYTE -3.18 -3.50)**

२० जानेवारी ते २० फेब्रुवारी दरम्यान ऑपरेशन मुस्कान राबवण्यात आलं होतं. त्यातून १६ फेब्रुवारी २०२६ पर्यंत ४५४ मुले आणि ९४७ मुली अशी एकूण १४०१ बालके शोधण्यात आली असल्याची माहिती गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिली.

**<><><><><><>**

बँका किंवा बिगरबँक वित्तीय संस्थांना कर्जपुरवठा प्रक्रीयेत रिझर्व बँकेने घालून दिलेल्या नियमांचं पालन करणं आवश्यक आहे, रिझर्व बँकेने घालून दिलेल्यापेक्षा जास्त व्याजदर लावणाऱ्या किंवा इतर नियमांचं उल्लंघन करणाऱ्या संस्था किंवा सावकारांचे परवाने रद्द केले जातील असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितल.

**<><><><><><>**

आखाती देशात अडकलेल्या नागरिकांच्या बाबतीत राज्य शासन सतर्क असून त्यांना सुरक्षित परत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली. अडकलेल्या नागरिकांचे संदेश आल्यावर तत्काळ केंद्र शासनाच्या परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधण्यात आला. नागरिकांना दूतावासाशी संपर्क साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असं ते म्हणाले. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्यावर समन्वयाची जबाबदारी सोपवली आहे. नागरिकांसाठी विशेष व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आला असून त्यावरून येणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असंही मुख्यमंत्री म्हणाले.

युद्धामुळे परदेशात अडकलेल्या शेतमाल निर्यातीचा प्रश्न गांभीर्याने घेतला जाईल, असं फडणवीस म्हणाले.

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री**

आंतरराष्ट्रीय तणावामुळे जेएनपीए बंदरात राज्यातील शेतकऱ्यांच्या फळे आणि भाज्यांनी भरलेले कंटेनर अडकल्यामुळे निर्यातीवर परिणाम होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीची शक्यता निर्माण झाली आहे. त्यासंदर्भात केंद्राशी संपर्क साधण्यात आला असून केंद्राने दिलेल्या सूचनांची माहिती सभागृहाला

देण्यात येईल, असं उत्तर राज्याचे मत्स्योत्पादन आणि बंदरं मंत्री नितेश राणे यांनी दिलं.

<><><><><><>

राज्यातल्या ई-पीक पेरा नोंदणी प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींवर उपाय म्हणून शासनानं शेतकऱ्यांना ऑफलाइन फोटो नोंदणीची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या सुविधेबाबत राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत माहिती दिली. नेटवर्क उपलब्ध नसताना शेतकऱ्यांनी काढलेला आपल्या शेतातल्या पिकाचा फोटो नेटवर्क आल्यानंतर आपोआप नोंदणी प्रणालीवर अपलोड होईल, असं बावनकुळे यांनी यावेळी सांगितलं.

पालघर जिल्ह्यातल्या सूर्या धरणामुळे विस्थापित झालेल्या चंद्रानगर आणि हनुमाननगर इथल्या आदिवासींना एका महिन्याच्या आत उर्वरित सर्व सात-बारा उतारे आणि जमिनीचे नकाशे वाटप करण्यात येतील, असंही ते म्हणाले.

<><><><><><>

स्फोटक कारखान्यांसंबंधी नियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य शासन केंद्र शासनाकडे सविस्तर निवेदन सादर करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले. नागपूर जिल्ह्यात स्फोटकांचे अकरा कारखाने आहेत, गेल्या तीन वर्षांत ४३ कामगारांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे या मुद्द्यावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्ताव दाखल केला होता. हा मुद्दा अतिशय गंभीर असून शुक्रवारच्या आत सभागृहात यावर चर्चा केली जाईल असं विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं.

<><><><><><>

मुंबई पुणे महामार्गावर धावणाऱ्या शिवनेरी सेवेचाही राज्यभर विस्तार करण्याच्या राज्यसरकारचा निर्णय असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप

सरनाईक यांनी दिली. त्यासाठी नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त २०० व्होल्व्हो बसेस खरेदी करण्याची निविदा प्रक्रिया सुरू आहे असं त्यांनी सांगितलं. या बस एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्यावर नाशिक–पुणे, नाशिक–छत्रपती संभाजीनगर, नाशिक–धुळे-जळगाव, पुणे–कोल्हापूर, पुणे–सांगली, पुणे–सोलापूर, नागपूर–चंद्रपूर, नागपूर–अमरावती–अकोला अशा प्रमुख मार्गांवर शिवनेरीची सेवा सुरू होईल.

बसस्थानकांवरील अस्वच्छतेच्या समस्येवर उपाय म्हणून स्वच्छतागृहे विनामूल्य आणि स्वच्छ राखण्यासाठी स्वतंत्र कंत्राटदार नेमण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**सरनाईक (Byte 1.05 - 1.27)**

**https://x.com/PratapSarnaik/status/2029157407784616355?s=20**

राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व आगारांमधली चालक-वाहक विश्रांतीगृहे आता अत्याधुनिक आणि वातानुकूलित करण्यात येणार आहेत, असंही ते म्हणाले.

**<><><><><><>**

राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी राज्यातल्या जागांकरता भारतीय जनता पार्टीने ४ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, ज्येष्ठ नेते विनोद तावडे, यांच्या खेरीज नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपात आलेले रामराव वडकुते या दोन नवीन चेहऱ्यांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><><>**

राज्यसभेत महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मुंबईत संयुक्त पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. पवार यांच्या उमेदवारीला काँग्रेस

पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी अनुकूलता दर्शवल्यानंतर राज्याचे प्रभारी रमेश चेन्निथला यांनी पाठिंब्याची घोषणा केली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानंही शरद पवार यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला असल्याची माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली.

राज्यसभेच्या ३७ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे.

<><><><><>

मध्य आशियातल्या युद्धाचा जोरदार फटका आजही देशातल्या शेअर बाजारांना जाणवला. दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार १२३ अंकांनी घसरुन ७९ हजार ११६ अंकांवर बंद झाला. निफ्टी ३८५ अंकांनी घसरुन २४ हजार ४८१ अंकांवर स्थिरावला. सत्रादरम्यान सेन्सेक्स ७९ हजारांच्या खाली गेला होता.

आशियायी बाजारातही मोठी घसरण दिसून आली.

ब्रेंट क्रूडचे दरही प्रति बॅरल ८४ डॉलरवर पोहोचले आहे. गेल्या सुमारे दीड वर्षातली ही उच्चांकी पातळी आहे. युद्ध सुरू झाल्यापासून कच्च्या तेलाच्या किंमती १५ टक्क्यांनी वधारल्या आहेत.

सोनं आणि चांदीचे दर आज मोठ्या प्रमाणात घसरलं. सोनं आज तोळ्यामागे सुमारे ५ हजार रुपयांनी घसरल्यानं १ तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ६३ हजार रुपये मोजावे लागत होते. चांदीचे दर किलोमागे साडे १८ हजार रुपयांनी कमी झाले त्यामुळं १ किलो चांदीचे दर २ लाख ७९ हजार रुपयांवर पोहोचले.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेतला पहिला उपान्त्य सामना आज कोलकात्यात ईडन गार्डन्स मैदानावर दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंडदरम्यान रंगणार आहे. सात वाजता सुरू झालेल्या या सामन्यात न्यूझीलंडनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

उपान्त्य फेरीत भारताची गाठ उद्या इंग्लंडशी पडेल. हा सामना मुंबईत वानखेडे मैदानावर होईल.

<><><><><><>

हवामान विभागाने उद्या सिंधुदुर्ग जिल्हा वगळता राज्यभरात उष्णतेचा यलो अलर्ट जारी केला आहे.

गेल्या २४ तासात विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात सरासरीच्या तुलनेत लक्षणीय वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त तापमान अकोला इथं ३८ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस नोंदलं गेलं.

//<><><><><><>//